# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या – २५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: ९९, रूपये:- २,००,००,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | १५७२ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहरातील मलकनगर परिसरात मोठ्या संख्येने विद्यार्थी दररोज शाळेत जाण्यासाठी रेल्वे रुळ ओलांडून प्रवास करीत असल्याचे गंभीर वास्तव समोर आलेले असणे, नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यानंतर या मार्गावर अंडरपास अथवा सुरक्षित पादचारी क्रॉसिंगची योग्य व्यवस्था करण्यात आलेली नसणे, त्यामुळे परिसरातील विद्यार्थी व नागरिकांना सुमारे ५०० मीटरचा नैसर्गिक व सुरक्षित मार्ग उपलब्ध असतानाही सुमारे ३ किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत असल्याने शैक्षणिक प्रवास अत्यंत खडतर व असुरक्षित झालेला असणे, रेल्वे वाहतूक सुरू झाल्यानंतर हा जुना मार्ग पूर्णपणे बंद होण्याची शक्यता असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिकच गंभीर होणार असणे, तसेच या परिसरात सुमारे १५०० लोकसंख्या वास्तव्यास असून अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असणे, परिणामी विद्यार्थी, पालक व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, त्यामुळे मलकनगर परिसरात तातडीने अंडरपास/फुटओव्हर ब्रिज/सुरक्षित पादचारी मार्गाची व्यवस्था करणे, रेल्वे व स्थानिक प्रशासनामध्ये समन्वय साधून सुरक्षित क्रॉसिंगची कायमस्वरूपी उपाययोजना राबविणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन आवश्यक निधी व तांत्रिक मंजुरी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १५७४ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहरातून महारेलद्वारे बांधण्यात आलेल्या दोन पुलांची अवस्था अत्यंत धोकादायक झालेली असल्याचे निदर्शनास आलेले असणे, विशेषतः भिवापूर नाका ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर बायपास चौकाकडे जाणाऱ्या पुलावर लोखंडी सळाखी बाहेर आलेल्या अवस्थेत दिसून येत असून त्यामुळे वाहनांचे टायर फुटणे, वाहनांचे नुकसान होणे तसेच गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, तसेच उमरेड-भिवापूर महामार्गावरील या पुलांची नियमित देखभाल व दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली असणे, यापूर्वीही या पुलांवर खड्डे, खचके व पाणी साचण्याच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | समस्या वारंवार निदर्शनास आलेल्या असणे आणि केवळ तात्पुरती डांबरी दुरुस्ती करून समस्यांचे दीर्घकालीन निराकरण न झाल्याचे स्पष्ट झालेले असणे, तसेच परिसरातील पथदिवे वारंवार बंद राहत असल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढलेला असणे, त्यामुळे महारेलच्या संबंधित यंत्रणेकडून पुलांची तातडीने संरचनात्मक तपासणी करून दुरुस्ती करणे, उघड्या पडलेल्या सळाखी व धोकादायक भाग सुरक्षित करणे, पथदिव्यांची कायमस्वरूपी कार्यक्षम व्यवस्था सुनिश्चित करणे तसेच राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीची सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १००, रूपये:- ३,००,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३) | १६८० | १० | पुणे शहर व जिल्ह्याची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी पुणे शहरालगत रिंग रोड प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला. मात्र, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून काही ठिकाणी पूर्णपणे बंद आहे. रिंग रोडचे काम रखडल्यामुळे प्रकल्पाची किंमत सातत्याने वाढत आहे. तसेच नागरिकांना दररोज वाहतूक कोंडी, इंधनाचा अतिरिक्त खर्च, वेळेचा अपव्यय आणि वाढत्या प्रदूषणाला सामोरे जावे लागत आहे. उद्योग, व्यापार व वाहतूक व्यवस्थेवरही याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाने प्रलंबित जमीन संपादन, निधी उपलब्धता आणि प्रशासकीय अडचणी तातडीने दूर करून रिंग रोड प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १६८५ | १० | पुणे शहराची लोकसंख्या व वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून पुणे शहरासाठी अंतर्गत (Inner Ring Road) व बाह्य (Outer Ring Road) असे दोन रिंग रोड प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बाह्य रिंग रोडचे काम हाती घेण्यात आले असले, तरी हवेली तालुक्यातील बहुतांश भागात अद्याप काम सुरू झालेले नाही. काही ठिकाणी अत्यंत संथ गतीने व तुटपुंज्या स्वरूपात काम सुरू असल्याने प्रकल्पाच्या पूर्णत्वास मोठा विलंब होत आहे. तसेच, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) मार्फत प्रस्तावित अंतर्गत रिंग रोडचे काम अद्याप सुरू झालेले नाही. या प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन, बाधित शेतकरी व जमीनमालकांना देण्यात येणारा मोबदला आणि इतर प्रशासकीय बाबींवर अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्यामुळे हा महत्त्वाचा प्रकल्प पूर्णपणे रखडलेला आहे. या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रिंग रोड प्रकल्पांमध्ये होत असलेल्या विलंबामुळे पुणे शहरातील नागरिकांना दररोज तीव्र वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय, इंधनाचा अतिरिक्त खर्च तसेच वायू प्रदूषणाला सामोरे जावे लागत आहे. यामुळे शहराच्या विकासावरही प्रतिकूल परिणाम होत आहे. यामुळे शासनाने अंतर्गत व बाह्य रिंग रोड प्रकल्पांतील सर्व प्रशासकीय, भूसंपादन व निधीविषयक अडचणी तातडीने दूर करून दोन्ही प्रकल्पांची कामे युद्धपातळीवर सुरू करून निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (५) | १५६९ | १० | नागपूर-जालना राष्ट्रीय महामार्गावरील उमरेड शहर प्रवेश परिसरातील गांगापूर पुलिया व त्यास लागून असलेल्या सर्व्हिस रोडवर दीर्घकाळापासून अपुरी व काही ठिकाणी पूर्णतः अकार्यक्षम प्रकाशव्यवस्था असल्याचे निदर्शनास आलेले असणे, या परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अंधार पसरत असल्याने नागरिक, वाहनचालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, सर्व्हिस रोडवरील अनेक ठिकाणी विद्युत खांब असतानाही दिवे न चालू राहणे, काही ठिकाणी वायरिंग जमिनीवर उघडी पडलेली असणे तसेच पुलाखालील भागात अत्यंत कमी प्रकाशामुळे अपघातांची शक्यता वाढलेली असणे, या परिसरातून छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपूल व गांगापूर चौकाकडे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने अपघाताचा धोका अधिक तीव्र झालेला असणे, यापूर्वी माध्यमांमध्ये वारंवार प्रकाशझोत टाकूनही कायमस्वरूपी उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झालेली असणे, त्यामुळे गांगापूर पुलिया व सर्व्हिस रोड परिसरातील संपूर्ण प्रकाशव्यवस्था तातडीने दुरुस्त करणे, सर्व निष्क्रिय दिवे व खांब कार्यान्वित करणे, आवश्यक ठिकाणी नवीन दिव्यांची उभारणी करणे, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी निश्चित करणे तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय साधून कायमस्वरूपी प्रकाशव्यवस्था सुनिश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १५७० | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड-नागपूर (एनएच ३५३-डी) चौपदरी राष्ट्रीय महामार्गावरील चांपा गाव परिसरातील टोल प्लाझा येथे सातत्याने तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आलेले असणे, टोल प्लाझा येथील फास्टॅग प्रणाली वारंवार 'सिस्टिम हँग' होत असल्याने वाहनचालकांना अनावश्यक विलंब व आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असणे, एकूण १६ गेटपैकी केवळ ८ गेट कार्यरत ठेवण्यात येत असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असणे, अनेक वेळा फास्टॅग स्कॅन न झाल्याचे कारण देऊन वाहनांना ब्लॅकलिस्ट असल्याचे सांगून रोख रक्कम किंवा अधिक शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी येत असणे, काही वाहनचालकांना नियमानुसार शुल्कापेक्षा जास्त रक्कम भरावी लागत असल्याची बाब पुढे आलेली असणे, या प्रकारामुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे, तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या सेवा गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, त्यामुळे चांपा टोल प्लाझा येथील फास्टॅग प्रणाली व संपूर्ण तांत्रिक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व्यवस्थेचे स्वतंत्र ऑडिट करणे, बंद असलेले सर्व गेट तातडीने कार्यान्वित करणे, अतिरिक्त व बेकायदेशीर टोल वसुलीवर नियंत्रण ठेवणे, तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे तसेच वाहनचालकांना सुरळीत व पारदर्शक सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १५७५ | १० | उमरेड ते नागपूर जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. 353डीच्या देखभाल व दुरुस्तीमध्ये भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) कडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे रस्त्याची अवस्था दयनीय झाली असून अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येणे, अनेक ठिकाणी डिव्हायडर तोडून तात्पुरता मार्ग तयार करण्यात आला असला तरी दुरुस्तीनंतरही मूळ डिव्हायडर पुनर्स्थापित न केल्याने दुचाकी वाहनचालक थेट विरुद्ध दिशेला जात असल्याने अपघाताचा गंभीर धोका निर्माण होणे, वेकोलि परिसरातील आम नदी पुलाजवळ व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात धूळ साचल्याने वाहनचालकांना दृश्यमानता कमी होऊन धोका वाढणे, सर्व्हिस रोडवरील अनेक पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी प्रवास अत्यंत धोकादायक बनणे, तसेच काही ठिकाणी रस्ता उंच-खालचा झाल्याने दुचाकी वाहनांचे नियंत्रण सुटण्याच्या घटना घडणे, नागरिकांच्या तक्रारी असूनही NHAI कडून नियमित देखभाल व दुरुस्ती होत नसल्यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, स्थानिक पातळीवर तक्रार निवारण केंद्र नसल्याने समस्या प्रलंबित राहणे, या सर्व बाबी लक्षात घेता महामार्गाची तातडीने दुरुस्ती, डिव्हायडर पुनर्स्थापना, रस्त्याची स्वच्छता, पथदिव्यांची दुरुस्ती तसेच स्थानिक तक्रार निवारण केंद्राची स्थापना करून नागरिकांच्या सुरक्षित प्रवासाची हमी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | १५७६ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड-भिवापूर राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झालेली असणे, उमरेड ते भिवापूर या सुमारे २२ कि.मी. मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले असणे, मौजा ठाणा येथील कापूस खरेदी केंद्र परिसर, कारगाव येथील महादेव मंदिर परिसर, जवराबोडी येथील शिवमंदिर परिसर, तास कॉलनी तसेच भिवापूर येथील समर्थ पेट्रोलपंपासमोरील रस्ता विशेषतः धोकादायक बनलेला असणे, या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असणे, दुचाकीस्वारांना मोठ्या प्रमाणात अपघातांचा सामना करावा लागत असणे, वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे अनेक नागरिक जखमी झालेले असणे, या मार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असताना संबंधित यंत्रणेकडून आवश्यक दुरुस्तीची कामे वेळेत करण्यात आलेली नसणे, त्यामुळे स्थानिक नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व व्यापारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे, या पार्श्वभूमीवर उमरेड-भिवापूर राष्ट्रीय महामार्गावरील सर्व खड्डे तातडीने बुजविणे, रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करणे, अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना राबविणे तसेच संबंधित कामातील निष्काळजीपणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | १६२५ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड–भिवापूर राष्ट्रीय महामार्गावरील सुमारे २२ कि.मी. रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय व धोकादायक झालेली असून, संपूर्ण मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले असणे,उमरेड ते भिवापूर या मार्गावर वाहतुकीस गंभीर अडथळे निर्माण होणे तसेच वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असणे,मौजा ठाणा येथील कापूस खरेदी केंद्र परिसर, कारगाव येथील महादेव मंदिर परिसर, जवराबोडी येथील शिवमंदिर परिसर, तास कॉलनी तसेच भिवापूर येथील समर्थ पेट्रोलपंपासमोरील रस्ता अत्यंत धोकादायक बनलेला असणे,दुचाकीस्वारांचे वारंवार अपघात होऊन अनेक नागरिक जखमी झालेले असणे तसेच अपघातांचे प्रमाण वाढल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असण,संबंधित यंत्रणेकडून रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीची व कायमस्वरूपी उपाययोजनांची कार्यवाही वेळेत करण्यात आलेली नसणे,स्थानिक नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व व्यापारी वर्गामध्ये या निष्काळजीपणामुळे तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१६, गृहनिर्माणावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०३, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. आदित्य ठाकरे** |
| (१०) | १६८२ | १० | वरळी विधानसभा कार्यक्षेत्रामध्ये पोलीसाच्या शासकीय वसाहतींची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असून पावसाळयात वसाहतीच्या घरांच्या छतातून पाणी गळती होणे, भिंतीचे प्लास्टर निघालेले असणे, सर्वत्र असलेली अस्वच्छता ,दरवाजे तुटलेले आदि अवस्था या वसाहतीतील घराची झालेली असल्याने या वसाहतींमधील घराची तात्काळ दुरुस्ती होणे गरजेचे असणे, चालू असलेल्या पावसाळयात पोलीस कुटुंबियाना राहणे मुश्कील झालेले असल्याने तातडीने निधी मंजूर करुन डागडुजी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (११) | १६८४ | १० | आरमोरी विधानसभा क्षेत्रातील पंचायत समिती व विविध शासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पुरेशा शासकीय निवासस्थानांची उपलब्धता नाही. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना खासगी निवासस्थानी राहावे लागते किंवा दूरवरून दररोज प्रवास करावा लागतो. याचा परिणाम प्रशासकीय कामकाजाच्या कार्यक्षमतेवर तसेच नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून देण्यावर होतो. विशेषतः दुर्गम व नक्षलग्रस्त भागात कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुरक्षित, दर्जेदार व शासकीय निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शासनाकडून कर्मचाऱ्यांच्या निवास सुविधांवर भर देण्याचे धोरण असून, अशा पायाभूत सुविधांमुळे प्रशासन अधिक सक्षम व परिणामकारक होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१२) | १५९० | १० | मुंबईतील नायगाव जुनी पोलीस वसाहतीअंतर्गत रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठया प्रमाणावर खड्डे पडले असणे, तसेच पावसाळयात येथे मोठया प्रमाणावर पाणी साचत असणे, त्यामुळे या रस्त्यावरुन ये-जा करणेस वसाहतीतील रहिवाशांची गैरसोय होणे, त्यामुळे या वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांकरिता काँक्रिटींग करणे व पाण्याचा निचरा होण्याकरीता भूमिगत गटाराचे बांधकाम करणे गरजेचे असणे, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम प्रशासनाने LA-1 मुख्यालय कार्यालयासमोरील व डाव्याबाजूकडील अंतर्गत रस्ता व भूमिगत गटाराचे बांधाकम, LA-1 मुख्यालयाच्या मागील बाजूचे तसेच परेड ग्राऊंडला लागून असलेल्या अंतर्गत रस्त्याची सुधारणा व भूमिगत गटाराचे बांधकाम, इमारत क्र. १ ते ८ दरम्यानच्या अंतर्गत रस्त्याची सुधारणा व भूमिगत गटाराचे बांधकाम, इमारत क्र.३च्या बाजूला तसेच मंदिर समोरील भागात व इमारत क्र.९ ते बालवाडी दरम्यानच्या रस्त्याची सुधारणा आणि भूमिगत गटाराचे बांधकाम या चार बाबींना मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला असणे, मात्र या प्रस्तावांना अद्याप मंजूरी व निधी न मिळाल्याने येथे व्यक्त होणारा रोष व नाराजीची भावना, सबब शासनाने या प्रस्तावांना मंजूरी व निधी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १५९५ | १० | सामान्य रुग्णालय मालवणी, भूमी पार्क, मालाड (पश्चिम) मुंबई येथै शासनाचे रुग्णालय असून त्याठिकाणी सार्वजनिक बांधण्यात विभागाने कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी इमारत गत १० वर्षापूर्वी बांधली असणे, सदरची इमारत रुग्णालयाच्या ताब्यात दिली नसणे, भोगवटा प्रमाण पत्र मिळाले नसणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांची निवासाची व्यवस्था करता येत नसणे, कर्मचाऱ्यांना निवासस्थानासाठी सदरची इमारत तातडीने हस्तांतरीत करणे, याकडे संबंधित बांधकाम विभागचे अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, परिणामी कर्मचाऱ्यांत व रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०४, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१४) | १५७७ | १० | नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यातील चिखली ते भिवापूर या सुमारे सहा किलोमीटर लांबीच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असणे, रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व रुग्णांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे, अनेक वर्षांपासून संबंधित रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे चिखली गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आमरण उपोषणाचे आंदोलन सुरू करावे लागलेले असणे, उपोषणस्थळी महसूल, बांधकाम, पंचायत समिती व पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन चर्चा केली असली तरी रस्त्याच्या कामास मंजुरीचे लेखी पत्र मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यास ग्रामस्थांनी नकार दिलेला असणे, तसेच आंदोलनाचा पुढील टप्पा म्हणून ग्रामस्थांनी जनगणना प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतलेला असणे, यामुळे शासनाच्या महत्त्वपूर्ण जनगणना कार्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, या पार्श्वभूमीवर चिखली-भिवापूर मार्गाच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी तातडीने निधी मंजूर करणे, कामाला प्रशासकीय मान्यता देऊन त्वरित सुरुवात करणे, ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेणे तसेच भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०५, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१५) | १५९१ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड ते मोहपा हा ग्रामीण मार्ग अत्यंत खराब अवस्थेत असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने हा मार्ग अपघातप्रवण व जीवघेणा झालेला असणे,सदर मार्गावर दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी (वा त्यासुमारास) सुभाष नामदेव भिवनकर व त्यांची मुलगी जान्हवी भिवनकर या दोन निष्पाप नागरिकांचा भीषण अपघातात जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडलेली असणे;,धुरखेडा ग्रामपंचायत अंतर्गत कुंभारी व मोहपा परिसरातील गिट्टी खदानांमुळे या अरुंद मार्गावर ओव्हरलोड, अवैध व अतिवेगाने जड वाहतूक (ट्रक, टिप्पर) मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यामुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झालेली असणे;,या जड वाहतुकीवर वाहतूक पोलीस व आरटीओ (RTO) प्रशासनाचे प्रभावी नियंत्रण नसल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण झालेला असणे, तसेच स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदन देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे,सदर परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असून वारंवार अपघात घडत असल्याने मानवहानी होत असल्याचे गंभीर वास्तव समोर आलेले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०६, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१६) | १५८५ | १० | मौजे फुगाळे (तालुका-शहापूर, जिल्हा-ठाणे) ग्रामपंचायती अंतर्गत वरसवाडी क्षेत्रात मुलभूत रस्त्याची सुविधा उपलब्ध नसल्याने स्थानिक नागरिकांना शहापूर/इगतपूरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | या तालुक्याच्या ठिकाणी जाताना अनेक अडी-अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मौजे फुगाळे परिसरात रस्त्याअभावी नागरिकांना आरोग्य सुविधा मिळविण्यासाठी डोलीचा आधार घ्यावा लागत असल्याचेही माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, तद्रुषंगाने स्थानिक नागरिकांनी तसेच, गावातील श्रमजीवी संघटनेने पक्का रस्ता तात्काळ बांधुन देण्याच्या दृष्टीने (१) मा.जिल्हाधिकारी, ठाणे (२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (बांधकाम), ठाणे (३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्रमांक-१, ठाणे (पश्चिम) (४) उप अभियंता, सा.बां.उपविभाग, शहापूर क्रमांक-१ यांचेकडे प्रत्यक्ष भेटून निवेदने सादर करुनही अद्यापही उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येणे, तद्रुषंगाने वरसवाडी क्षेत्रात पक्का रस्ता तात्काळ बांधून देण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | १५८६ | १० | मुरबाड तालुक्यातील (जिल्हा-ठाणे) वैशाखरे गटातील वनाचीवाडी-झाडघर ह्या रस्त्याची दूरावस्था होऊन खड्डयांच्या खाईत रुपांतरित झाला असून सुमारे ६५ घरांच्या वस्तीत राहणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे टोकवडे बाजारपेठेकडे जाणारे शेतकरी, मजूर तसेच, शाळकरी विद्यार्थी यांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत असून वारंवार अपघात घडत असल्याची बाब निदर्शनास येणे, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली असून विशेषत: दुचाकी घसरुन अपघात होण्याच्या घटना वाढल्या आहेत व पावसाळा तोंडावर आल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने स्थानिक नागरिकांनी संबंधीत प्रशासनाकडे वारंवार मागणी करुनही रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यांत आलेली नाही, सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती/डांबरीकरण करण्याबाबत व रस्ता दुरुस्ती करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१६, गृहनिर्माण भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०७, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (१८) | १६७५ | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड व मालेगाव तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग आणि राष्ट्रीय मार्गाची दुरावस्था असून या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (१९) | १६७० | १०० | सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील विविध रस्त्यांची दुरावस्था झालेली असणे, निधी नसल्याने रस्त्यांच्या सुधारणांची कामे रखडलेली असणे, शिरगांव वाळवा अहिरवाडी गोटखिंडी भडकंबे बहादूरवाडी कुणेगांव रस्ता प्रजिमा ११७ कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असणे , वाळवा पडवळवाडी बावची नागांव ढवळी शिगांव रस्ता प्रजिमा - ११ कि.मी. ०/०० ते ७/०० ची सुधारणा करण्याची आवश्यकता, नागांव आष्टा रस्ता प्रजिमा-१५ कि.मी. ५/२०० ते ६/९०० ची रुंदीकरणासह सुधारणा करण्याची आवश्यकता, राजमाचीवाडी बहे नरसिंहपूर इस्लामपूर कामेरी शिवपुरी रस्ता प्र.जि.मा. १४ कि.मी ०/०० ते ७/०० मध्ये रस्ता सुधारणा करण्याची आवश्यकता, वाळवा तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील दळणवळण सुलभ होण्यासाठी, अपघात टाळण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या सोयीसाठी या मुख्य जिल्हा मार्गांची व रस्त्यांची सुधारणा करणे अत्यंत निकडीचे बनलेले असणे. या करिता निधी मंजूर करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | १६७१ | १०० | सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील विविध रस्त्यांची दुरावस्था झालेली असणे, निधी नसल्याने रस्त्यांच्या दुरुस्तींची कामे रखडलेली असणे, इस्लामपूर नवेखेड जुनेखेड पुणदी रस्ता प्र.जि.मा.३६ कि.मी १०/०० ते १२/०० मध्ये रस्ता सुधारणा करण्याची आवश्यकता, रा मा १५० ते साखराळे वाळवा तुजारपूर कामेरी ते रा म मा रस्ता प्र.जि.मा. १५६ कि.मी ०/०० ते १०/०० मध्ये रस्ता सुधारणा करण्याची आवश्यकता, आणि बोरगाव गोटखिंडी रस्ता प्र.जि.मा. १६१ कि.मी ०/०० ते ४/०० मध्ये रस्ता सुधारणा करण्याची आवश्यकता, वाळवा तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील दळणवळण सुलभ होण्यासाठी, अपघात टाळण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या सोयीसाठी या मुख्य जिल्हा मार्गांची व रस्त्यांची सुधारणा करणे अत्यंत निकडीचे बनलेले असणे, या कामांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२१) | १५८८ | १० | उमरेड तालुक्यातील पचखेडी–दहेगाव–वेळगाव हा ग्रामीण मार्ग अत्यंत खराब अवस्थेत असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले असणे,डांबरी थर पूर्णपणे उखडल्यामुळे सदर मार्ग वाहनचालकांसाठी धोकादायक व अपघातप्रवण बनलेला असणे;या मार्गावरून शाळा, महाविद्यालये, बाजारपेठ, शासकीय कार्यालये तसेच आरोग्य सेवा मिळविण्यासाठी शेकडो नागरिक, शेतकरी व विद्यार्थी दररोज प्रवास करीत असणे;रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वारंवार दुचाकी अपघात घडून अनेक नागरिक जखमी झाले असून काहींना गंभीर इजा व कायमस्वरूपी अपंगत्व आल्याच्या घटना घडलेल्या असणे;स्थानिक ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी प्रशासनाकडे दुरुस्तीबाबत पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे,परिणामी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून रस्त्याचे तात्काळ नूतनीकरण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२२) | १५८४ | १० | मौजे बोरगांव ग्रुप ग्रामपंचायत (तालुका-पेण, जिल्हा-रायगड) येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पांचही आदिवासी पाड्यांमधील ४५० लोकवस्ती असलेल्या नागरीकांना पेण-सुधागड तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी ६ कि.मी.अंतर टेकडीवरुन पायवाटेने जावे लागत असल्याने गावातील ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने (१)मा.जिल्हाधिकारी,रायगड (२) जिल्हापरिषद, रायगड सा.बा.विभाग यांचेकडे जानेवारी, २०१५ वा त्यापूर्वीपासून सातत्याने मागणी करुनही अद्यापपर्यन्त रस्ता करुन दिलेला नाही, मौजे बोरगांव येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पांचही आदिवासी पाड्यांमध्ये जाणाऱ्या रस्त्यांसाठी जानेवारी, २०२४ मध्ये मे.सिध्दिविनायक कन्स्ट्रक्शन या कंपनीला ७ कोटी ६० लाख इतका निधी उपलब्ध करुन देवूनही अद्यापर्यन्त रस्त्यांची कामे सुरु झालेली नाहीत, मौजे बोरगांव येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पांचही आदिवासी पाड्यांसाठी ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे रस्ता तयार करुन देण्यासाठी शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | १६०८ | १० | कळंबस्ते, मोहल्ला पोष्ट ऑफिस (ता.संगमेश्वर, जि.रत्नागरी) ते कब्रस्तान दर्ग्याकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली असणे, हा रस्ता वाहतुकीस अयोग्य झाली असणे, या रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करण्याची झालेली आवश्यकता लक्षात घेता शासनाने १७ लक्ष इतक्या रकमेच्या कामास दि.२९/९/२०२५ दरम्यान मंजूरी देणे, मात्र मोठा कालावधी उलटूनही अद्याप काम सुरु न होणे, त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांत व्यक्त होणारा असंतोष, याबाबत शासनाने या रस्त्याच्या कॉक्रिटीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११७, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. रामदास मसराम** |
| (२४) | १६८३ | १० | वडसा हे गडचिरोली जिल्ह्यातील महत्त्वाचे कृषी केंद्र असून परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी विविध पिकांची लागवड करतात. मात्र कृषी विभागाचे सर्वंकष शासकीय कार्यालय व आधुनिक शेतकरी प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मार्गदर्शन, तांत्रिक सल्ला, प्रशिक्षण व विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दूरवर जावे लागते. कृषी विज्ञान केंद्रे व कृषी विभागाच्या प्रशिक्षण व्यवस्थेचा उद्देश शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक शेती तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रात्यक्षिके पोहोचविणे हा आहे. त्यामुळे वडसा येथे स्वतंत्र कृषी विभागाचे शासकीय कार्यालय तसेच अत्याधुनिक शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करून त्यासाठी आवश्यक इमारत, मनुष्यबळ, प्रशिक्षण सभागृह, प्रात्यक्षिक प्लॉट, मृदा व जल परीक्षण सुविधा आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देणबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२६, रूपये:- १६,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२५) | १६०५ | १० | सामान्य रुग्णालय मालवणी जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम) मुंबई येथे २०० खाटांचे श्रेणीवर्धन नविन रुग्णालय उभारण्याची आवश्यकता असणे, प्रस्ताव तयार आहे, परंतु निधीच्या कमतरतेमुळे रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम अद्याप झालेले नसणे, परंतु कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी जनतेत व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २९ जून, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई